नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक २८/०३/२०२२ (सोमवार)**

**(दुपार)**

---

## रेती चोरी करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. खापरखेडा** :– अंतर्गत ०६ कि.मी. अंतरावरील पिपळा डाक बंगला येथे दिनांक २८/०३/२०२२ चे ०२.०० वा. ते २८/०३/२०२२ चे ०२.४५ वा. दरम्यान फरार आरोपी हा इसापुर कन्हान नदीचा पात्रातुन हिरव्या रंगाचा नविन विना क्रमांकाचा जॉनडियर कंपनीचा ट्रैक्टर मॉडल क्र– ५०४५ एचपी ४६ व ट्राली क्र– एमएच– ३१/ बीबी ६७१२ या गाडीने अवैधरित्या विना परवाना रेतीचा चोरटी वाहतुक करतांना मिळुन आले. आरोपीस गाडी थांबविन्याकरीता इशारा केल्याने आपल्या ताब्यातील वाहन घटना ठिकानी सोडुन पळुन गेला. ट्रालीमध्ये अंदाजे १ ब्रास रेती किमती. ३,०००/–रु. व हिरव्या रंगाचा बिना नंबरचा नविन ट्रैक्टर असा एकुण कि. ६,७३,०००/– रु. मुद्देमाल जप्त करण्यात आलेला आहे.

सदर प्रकरणी सरतर्फे पोलिस नाईक प्रमोद भोयर पो.स्टे खापरखेडा यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. खापरखेडा येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि मिश्रा मो.नं. ७३५०११२५४७ हे करीत आहे.

## गैरकायदयाची मंडळी

**पो.स्टे. पारशिवनी** :– अंतर्गत ०३ कि.मी अंतरावरील पालोरा बस स्टॉप येथे दिनांक २६/०३/२०२२ चे २३.०० वा. दरम्यान आरोपी १) इरफान हबीब पठान वय ३० वर्ष व २) अज्जु नबीब पठान वय २६ वर्ष हे चुलत भाऊ असुन त्यांच्यात पुर्वी झगडा होता. आरोपी क्र. १ व आरोपी क्र. २ या दोघांमध्ये फिर्यादी नामे– आशिष नामदेव भड, वय ३९ वर्ष, रा. प्रभाग क्र.१७ पारशिवनी याने झगडा–भांडण लावले आहे, असे दोघांना कळले. त्यामुळे आरोपी क्र. १ व २ यांनी त्यांचे इतर साथीदार आरोपी क्र. ३) मोनु पृखराज जैन रा. पारशिवनी, वय २८ वर्ष, रा. पारशिवनी, ४) असलम उर्फ असु नबीब पठान वय २४ वर्ष, ५) स्वप्नील मधुकर कुंभलकर वय २९ वर्ष, ६) रतन प्रकाश अंबाडारे वय २१ वर्ष सर्व रा. पालोरा यांच्यासह गैरकायदयाची मंडळी एकत्रीत करून फिर्यादी हा त्याचे मित्रासोबत मोटारसायकलने डबल सिट नयाकुंड ते पारशिवनी कडे जात असतांना त्यांचा रस्ता अडवुन थांबवून फिर्यादीस अश्लिल भाषेत शिवीगाळ करून लाकडी दांडयाचे व सळाख सारख्या वस्तुने मारहाण करून जखमी केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. पारशिवनी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३४१, २९४, ३२४, १४३, १४८, १४९, ५०४ भादंवी अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील पोउपनि श्री ज्ञानोबा पळनाटे मो.क्र. ७३८७०८६१७८ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर